महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २१३ वे | दिनांक : २८/०७/२०२६ | वार : मंगळवार

## सुप्रिया सुळेंची अमित शहांशी भेट; महाराष्ट्राच्या राजकारणात नवा ट्विस्ट ?



**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस एनडीएमध्ये सामील होणार असल्याच्या चर्चांना उधाण आले असून, त्यासाठी पडद्यामागे मोठ्या हालचाली सुरू असल्याचे बोलले जात आहे. या सर्व राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आता एक अत्यंत खळबळजनक माहिती समोर आली असून, राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्या तथा खासदार सुप्रिया सुळे यांनी थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्याचे वृत्त आहे. त्यांच्यासोबत खासदार बजरंग सोनवणे देखील उपस्थित होते.

यापूर्वी खासदार शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घेतलेली भेटही राजकीय वर्तुळात मोठ्या चर्चेचा विषय ठरली होती. राज्यात एकीकडे विविध राजकीय घडामोडी आणि आंदोलने सुरू असतानाच ती महत्त्वपूर्ण भेट पार पडली होती. या जुन्या चर्चेचा संदर्भ ताजा असतानाच, आता पुन्हा एकदा खासदार सुप्रिया सुळे यांनी थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्याने राजकीय क्षेत्रात नव्याने चर्चांना उधाण आले आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, सुप्रिया सुळे यांच्या कन्या रेवती सुळे यांच्या लग्नाचे रिसेप्शन दिल्लीत आयोजित करण्यात आले आहे. त्यासाठी सुप्रिया सुळे अमित शहा यांना निमंत्रण देण्यासाठी भेटले असल्याचे बोलले जात आहे. तर बीडच्या कायदा सुव्यवस्थेबाबत खासदार बजरंग सोनवणे यांनी शहा यांना पत्र दिले असल्याचे समजते.

या सर्व राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर, दिल्लीतील भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी राज्यातील भाजप नेत्यांना 'शरद पवार यांचा पक्ष एनडीएत सहभागी होणार असून त्यासाठी तयार राहा' असा संदेश दिल्याची सध्या जोरदार चर्चा आहे. ही माहिती खरी ठरल्यास लवकरच शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस एनडीएमध्ये सामील होण्याची दाट शक्यता आहे. विशेष म्हणजे, खासदार सुप्रिया सुळे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेण्यापूर्वी, राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे खासदार सुनील तटकरे यांनीही शाह यांची भेट घेतली होती. त्यामुळे नेत्यांच्या या वाढत्या गाठीभेटी आणि दिल्लीतील घडामोडी पाहता, राज्याच्या राजकारणात भविष्यात कोणते नवे वळण येणार, हे पाहणे आता अत्यंत रंजक ठरणार आहे.राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सर्वेसर्वा आणि ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी आज सकाळी खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. विशेष म्हणजे, कालच जंतरमंतरवर जाऊन शरद पवारांनी 'नीट' पेपरफुटीप्रकरणी सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनास आपला जाहीर पाठिंबा दिला होता आणि त्यानंतर लगेचच त्यांनी पंतप्रधानांची भेट घेऊन शेती व शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तसेच विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर चर्चा केल्याची माहिती त्यांनी ट्विट करत दिली आहे.




## भुसेंना काँग्रेसचा ७ दिवसांचा अल्टिमेटम



**मुंबई :** राज्यातील आणि देशातील शिक्षण व्यवस्थेत सातत्याने होणाऱ्या पेपरफुटी, मराठी शाळा बंद पडण्याची स्थिती आणि विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवरून काँग्रेसची विद्यार्थी आघाडी 'एनएसयूआय' (NSUI) आणि युवक काँग्रेसने राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी या सर्व प्रश्नांची नैतिक जबाबदारी स्वीकारून सात दिवसांच्या आत राजीनामा द्यावा, अन्यथा त्यांच्या घरावर भव्य मोर्चा काढून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा थेट इशारा एनएसयूआयचे प्रदेशाध्यक्ष सागर साळुंखे आणि युवक काँग्रेसच्या मुंबई प्रदेशाध्यक्षा झीनत शबरीन यांनी दिला आहे.

टिळक भवन, मुंबई येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी विद्यार्थ्यांच्या वतीने तयार केलेली शालेय शिक्षणमंत्र्यांची 'मार्कशीट' प्रकाशित करत सरकारचे वाभाडे काढले.

एनएसयू आयच्या पदाधिकाऱ्यांनी राज्यभरातील लाखो विद्यार्थी, पालक आणि युवकांशी संवाद साधून शिक्षणमंत्री दादा भुसे यांची एक विशेष 'मार्कशीट' तयार केली आहे. या मार्कशीटच्या माध्यमातून त्यांनी मंत्र्यांच्या कामकाजाचे मूल्यमापन केले असून, त्यात पेपरफुटी, शालार्थ आयडी घोटाळा आणि शाळा बंदी यांसारख्या विषयांचा समावेश आहे. "ज्याप्रमाणे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना नैतिक जबाबदारी स्वीकारावी लागली, तशीच जबाबदारी स्वीकारून दादा भुसेंनी राजीनामा द्यावा," अशी मागणी करण्यात आली आहे.

साळुंखे यांनी राज्य सरकारच्या मराठी शाळा बंद करण्याच्या धोरणावर कडाडून टीका केली. "राज्यात आतापर्यंत १,२०० पेक्षा जास्त मराठी शाळा बंद झाल्या आहेत आणि १७,५०० शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत. केवळ पटसंख्येच्या नावाखाली गरिबांच्या आणि वंचितांच्या मुलांना शिक्षणापासून दूर ठेवण्याचे हे षड्यंत्र आहे," असा आरोप त्यांनी केला. त्यांनी जपानचे उदाहरण दिले, जिथे एका विद्यार्थिनीसाठी तीन वर्षे रेल्वे स्टेशन चालू ठेवण्यात आले होते.

माध्यमिक शिक्षणात मुलींचा 'ड्रॉप-आउट' (शाळा गळती) रेट प्रचंड वाढला असून, २०१४-१५ मध्ये हे प्रमाण १०.३% होते. शौचालयांचा अभाव, शाळेपासूनचे अंतर आणि बालविवाह यांसारख्या कारणांमुळे मुली शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

राज्यातील प्राथमिक शिक्षण व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असल्याचा दावा त्यांनी केला. "संपूर्ण महाराष्ट्रातील शाळांमधील वर्ग ओस पडले आहेत, कारण बहुतांश शिक्षक बीएलओ (BLO) आणि इतर निवडणुकीच्या कामांमध्ये व्यस्त आहेत. मुंबईत 85 ते 90% शिक्षक ड्युटीवर आहेत. नुकतेच मुंबईत एका शिक्षकाचे तणावामुळे निधन झाले. बेरोजगारीचा प्रश्न गंभीर असताना हे काम बेरोजगार तरुणांना का दिले जात नाही?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

शिक्षण खात्यातील इतर मंत्र्यांवरही जोरदार आरोप करण्यात आले. "राज्यात बोगस नर्सिंग महाविद्यालयांचा सुळसुळाट झाला आहे. मुश्रीफ हे वैद्यकीय शिक्षणमंत्री न राहता बोगस नर्सिंग कॉलेज वाटणारे मंत्री झाले आहेत," अशी खोचक टीका करण्यात आली. त्यांनी नंदुरबार येथील 'एमकेडी' (MKD) कॉलेजचे उदाहरण दिले, जिथे आदिवासी विद्यार्थ्यांकडून लाखो रुपयांचे डोनेशन घेऊन फसवणूक केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २८ जुलै २०२६


## विठ्ठलाच्या नामघोषाने दुमदुमली भोकनगाव नगरी



**कन्नड (अरुण थोरात) :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भोकनगाव येथे वारकरी संप्रदायाची भक्तीपरंपरा जपत भव्य दिंडी सोहळ्याचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. टाळ-मृदंगाच्या गजरात, "ज्ञानोबा-तुकाराम", "पांडुरंग हरी" आणि "राम कृष्ण हरी"च्या अखंड नामस्मरणाने संपूर्ण भोकनगाव नगरी भक्तिमय वातावरणाने भारावून गेली.वारकरी वेशभूषेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी हातात भगव्या पताका, टाळ, चिपळ्या आणि तुळशीच्या रोपांसह शिस्तबद्ध दिंडी काढली. संतांच्या अभंगांचा गजर करीत, पावली खेळत आणि विठ्ठलभक्तीचा संदेश देत ही दिंडी गावातील प्रमुख रस्ते व चौकातून मार्गक्रमण करत होती. दिंडीचे ग्रामस्थांनी ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करून स्वागत केले. अनेक घरांमध्ये विठ्ठल-रखुमाई यांच्या प्रतिमेचे भक्तिभावाने पूजन व आरती करण्यात आली.या उपक्रमातून विद्यार्थ्यांना संतपरंपरा, वारकरी संस्कृती, सामाजिक समता, पर्यावरणप्रेम, शिस्त, भक्ती आणि भारतीय संस्कृतीची ओळख करून देण्यात आली. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, पारंपरिक वेशभूषा आणि अभंगगायनामुळे दिंडी सोहळ्याला विशेष आकर्षण लाभले.यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता जालनापूरकर, प्राथमिक पदवीधर शिक्षिका मनीषा पाटील, शिक्षक मुकुंद निकम, योगेश पवार, गोकुळ निंबाळकर, आशिष दापके, तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, प्रतिष्ठित ग्रामस्थ, पालक, माता-भगिनी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्या सहकार्याने करण्यात आले. या उपक्रमाचे केंद्रप्रमुख शेळके सर यांनी विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध सहभागाचे व शिक्षकांच्या नियोजनाचे विशेष कौतुक केले.






## उच्च प्राथमिक व पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इकरा पब्लिक स्कूलचे विद्यार्थी पात्र; गुणवंतांचा सत्कार



**जळगाव :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (UPS) - २०२६ (इयत्ता ७ वी) आणि पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ४ थी) या दोन्ही परीक्षांमध्ये इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, मोहाडी (जि. जलगाव) च्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत यश संपादन केले आहे.इयत्ता ७ वीच्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेची विद्यार्थिनी कु.मरियम बी नूर मोहम्मद पटेल ही उत्कृष्ट गुणांसह शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरली आहे.तसेच इयत्ता ४ थीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थी जोहान युनूस पिंजारी व जरयान शाकीर मुजावर यांनी उल्लेखनीय यश मिळवून शिष्यवृत्ती पटकावली आहे.गुणवत्तेची प्रदीर्घ परंपरा जपणाऱ्या इकरा पब्लिक स्कूलचे विद्यार्थी सातत्याने विविध राज्यस्तरीय परीक्षांमध्ये चमकदार कामगिरी करत आहेत.आतापर्यंत शाळेच्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांनी विविध शिष्यवृत्ती परीक्षांच्या माध्यमातून एकूण रुपये १,७०,०००/- (एक लाख सत्तर हजार) ची शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे.विद्यार्थ्यांच्या या देदीप्यमान यशाबद्दल शाळेत विशेष गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी संस्थेचे चेअरमन डॉ.करीम सालार,श्री.एजाज मलिक, तसेच प्राचार्य श्री. शेख शकील यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व रोख रक्कम देऊन विशेष सत्कार करण्यात आला व त्यांच्या पुढील शैक्षणिक प्रवासासाठी उज्वल शुभेच्छा देण्यात आल्या. या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.,

## जागतिक निसर्ग संवर्धन दिनानिमित्त राजीव गांधी महाविद्यालयात ३८ वृक्षांचे वृक्षारोपण



**करमाड (प्रतिनिधी) :** राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभाग, राजीव गांधी महाविद्यालय, करमाड यांच्या वतीने जागतिक निसर्ग संवर्धन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यासाठी महाविद्यालय परिसरात विविध प्रजातींच्या ३८ वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. विशेष म्हणजे लावण्यात आलेल्या प्रत्येक वृक्षाच्या संवर्धनाची जबाबदारी विद्यार्थी व प्राध्यापकांनी स्वेच्छेने स्वीकारली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सदाशिव मुळे हे होते. त्यांनी आपल्या मनोगतात वृक्षलागवड ही काळाची गरज असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असे प्रतिपादन केले.राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. बाळासाहेब लिहिणार यांनी जागतिक निसर्ग संवर्धन दिनाचे महत्त्व स्पष्ट करताना, "वृक्ष लावणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून पुढील पिढ्यांप्रती असलेले कर्तव्य आहे. वृक्षारोपणाइतकेच वृक्षसंवर्धनही महत्त्वाचे आहे," असे सांगितले.सह कार्यक्रम अधिकारी प्रा. कालिदास दिनकर फड यांनी पर्यावरण संवर्धनासाठी युवकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. वृक्षलागवड ही एकदिवसीय मोहीम नसून ती सातत्याने जोपासण्याची चळवळ असल्याचे त्यांनी नमूद केले.यावेळी प्रा.मनोज देवकर, डॉ.नरेश डहाळे, डॉ लक्ष्मण दांडगे, डॉ. सुखदेव पोटदुखे, प्रा. अतुल मोरे, प्रा. सौरभ चव्हाण, प्रा. नितीन मुळे, प्रा. अमित राऊत, प्रा. निखिल साबळे, प्रा. जयश्री पाटील, प्रा. प्रकाश बांगर, डॉ. इमरान पठाण, प्रा. लक्ष्मण खरात, प्रा. तन्मय भावसार, प्रा. रामदास घोडके, प्रा. प्रशांत माटे, प्रा. नानासाहेब लावंड, प्रा. ज्ञानेश्वर कोठुळे, प्रा. योगेश शिंदे, डॉ. किशोर काळे यांच्यासह महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमादरम्यान पर्यावरण संरक्षणाची सामूहिक शपथ घेण्यात आली. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि वृक्षतोड यावर प्रभावी उपाय म्हणून वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनाची गरज अधोरेखित करण्यात आली. महाविद्यालय परिसर हिरवागार करण्याच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.कार्यक्रमाचे नियोजन व यशस्वी आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने करण्यात आले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २८ जुलै २०२६


## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात करिअर कट्टा स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन



**उमरगा** : विद्यार्थ्यांना एमपीएससी, यूपीएससी, पोलिस भरती, बँकिंग, रेल्वे , तसेच इतर स्पर्धा परीक्षांची प्रभावी तयारी करता यावी, या उद्देशाने करिअर कट्टा सेंटर फॉर एक्सलन्स श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात स्थापन करण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय अस्वले यांच्या हस्ते संपन्न झाले.उद्घाटनप्रसंगी बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना तलाठी, पोलिस, ते स्टाफ सिलेक्शन, बँकिंग, MPSC, UPSC सारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयात नियमित उपस्थित राहावे, करिअर कट्टा स्पर्धा परीक्षा केंद्रात सकाळी 6 ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत मैदानी सराव, नियमित मार्गदर्शन वर्ग आणि करिअर कट्टा ऑनलाईन क्लास या बरोबर पुस्तकासह अभ्यासिका याची सोय नाममात्र शुल्कात आहे. विद्यार्थ्यानी सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य नियोजन आणि आत्मविश्वास ठेवला तर तीन वर्षात स्पर्धा परीक्षेत यशस्वी व्हाल असे आवाहन डॉ अस्वले यांनी केले. यावेळी महाविद्यालयात करिअर कट्टा अंतर्गत अभ्यासिकेत उपलब्ध करून देण्यात आलेल्या संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, डिजिटल अध्ययन सुविधा आणि नियमित मार्गदर्शन वर्गांची पोलिस अकॅडमी ची आणि विशेष स्टाफ ची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. या केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दर्जेदार मार्गदर्शन, अभ्यास साहित्य तसेच सराव परीक्षा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे प्राचार्यांनी सांगितले.या कार्यक्रमास करिअर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. अर्जुन कटके ,प्रा.डॉ. चंद्रसेन करे ,स्पर्धा परीक्षेचे सहसमन्वयक प्रा. डॉ. राम जाधव,सुरवसे मॅडम, गायकवाड मॅडम, पूजा कटके मॅडम तसेच विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हे केंद्र महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करिअर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. समाधान पसरकल्ले यांनी केले, तर आभार प्रा. आशिष घंटे यांनी केले.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## माकड

माकडा रे माकडा
पळतोस किती लांब
दात नको खाऊ
थोडा तरी थांब

माकडा रे माकडा
करू नकोस हुप हुप
लहान मुलं घाबरतात
बस ना थोडा चूप

माकडा रे माकडा
करतोस किती खोड्या
या छतावरून त्या छतावर
मारतोस किती उड्या

माकडा रे माकडा
येऊ नकोस घरात
टोपल्यातली पोळी खाऊन
पळतोस किती जोरात

माकडा रे माकडा
शेपटी किती मोठी
झाडावर उडी मारतोस
कुत्रा लागता पाठी



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## जि.प.प्रा. शाळेत स्वर्गीय अजितदादा पवार यांची जयंती साजरी



***छायाचित्र*** *:- स्वर्गीय लोकनेते अजित दादापवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करतांना लेखक अय्युब पठाण लोहगावकर, मुख्याध्यापक किरण आंबेकर, सहशिक्षक मनोज खुटे व बबन चव्हाण दिसत आहे.*

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** : ता. जि. संभाजीनगर जटवाडा जवळील ओहर केंद्रा अंतर्गत रहाळपट्टी तांडा येथील जि. प. प्रा. शाळेत नुकतेच महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री लोकनेते स्वर्गीय अजित दादापवार यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी संपूर्ण महाराष्ट्र राज्याच्या प्राथमिक शाळेत बालभारतीच्या इयत्ता चौथीला असलेल्या " कौतुकाची थाप" या पाठाचे प्रसिद्ध लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांच्या शुभ हस्ते स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला त्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच या याप्रसंगी रहाळपट्टी तांडा येथील जि. प. प्रा. शाळेचे मुख्याध्यापक श्री. किरण आंबेकर सहशिक्षक व कवी मनोज खुटे तसेच शिक्षक बबन चव्हाण आणि पालक वर्ग व विद्यार्थी हे लोकनेते स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तेरणा हायस्कूलमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**छत्रपती संभाजीनगर** : छत्रपती संभाजीनगर येथील तेरणा हायस्कूलमध्ये इ.10 वी बोर्ड परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला.या वर्षी शाळेतून प्रथम क्रमांक श्रावणी सचिन शहाणे , द्वितीय क्रमांक प्रथम अरविंद कुंटुरवार तर तृतीय क्रमांक ईशा मुकेश बुट्टेमाळी या विद्यार्थ्यांनी मिळवला. गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक के.पी.पवार होते. यावेळी केशवराव मुंडेआणि रमेश प्रधान प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी पुढील वाटचालीसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २८ जुलै २०२६

## निरखून पाहता मनात

निरखून पहावे प्रत्येकाने,
सदैव आपल्या मनात.
विचार करावे सर्वांचे,
होईल नाव कायम जनात. १

निरखून पाहता मनात,
मी कसा आहे कळतो.
सतगुणांना जपता मनी,
दुर्गुण कायमचे पळतो. २

आरशात स्वतःला पाहता,
माझ्यात मला मी दिसतो.
मनातला मीपणा पाहून,
स्वतःवरच पुन्हा हसतो. ३

माझ्यातला मीपणा पाहून,
मलाच खूप वाईट वाटते.
अंतर्मनात डोकावता कळते,
शरीर रोगांचे बाजार थाटते. ४

शक्य होईल तेवढ्या लवकर,
प्रत्येकाने स्वतःला पहावे.
सतगुणांची जोपासना करून,
दुर्गुणांना कायम दूर करावे. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## शिष्यवृत्ती परीक्षेत अभिनव विद्या विहार प्राथमिक शाळेच्या पाच विद्यार्थ्यांचे यश



**पूर्णा :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता चौथी)च्या अंतरिम निकालात अभिनव विद्या विहार प्राथमिक शाळेच्या पाच विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये कु. अनया आनंदा जाधव, कु. स्वरांजली अजय शिंदे, कु. तनुजा नवनाथ कुऱ्हे, कु. कुंता माधव सूर्यवंशी व आयुष रंगनाथ जोगदंड यांचा समावेश आहे.या यशाबद्दल शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष आनंदजी अजमेरा, माजी मुख्याध्यापक हिराजी भोसले, शालेय शिक्षण समितीचे सदस्य दिलीप माने, सचिव विजय लोणीकर, मुख्याध्यापक सत्यनारायण रणवीर, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. निर्मला रेड्डी, पर्यवेक्षक रमेश सूर्यवंशी तसेच मार्गदर्शक व उपक्रमशील शिक्षक विठ्ठल अनमुलवाड, अंकुश कल्याणकर व कृष्णकांत दुधाटे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, जिद्द, चिकाटी आणि शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले आहे. त्यांच्या या यशाबद्दल पालक व शाळा परिसरातून विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

## श्रीकृष्ण महाविद्यालयात कारगिल विजय दिवस साजरा



**गुंजोटी : (प्रा. नागसेन कांबळे)** येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने कारगिल विजय दिन मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. श्रीकृष्ण महाविद्यालय, गुंजोटी परिसरातील विविध पदावर कार्यरत राहून सेवानिवृत्त झालेल्या माजी सैनिक, मेजर ,कॅप्टन हवालदार व नायक यांना आदरपूर्वक निमंत्रित करून त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला." तुम्ही आहोत म्हणून आम्ही आहोत" या कृतज्ञतेच्या भावनेने प्रेरित होऊन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड यांनी यावर्षीच्या विजय कारगिल दिनाचे औचित्य साधून गुंजोटी पंचक्रोशीतील विविध माजी सैनिकांना एकत्र करून महाविद्यालय व संस्थेच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ.उमाकांत सूर्यवंशी हे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड हे होते.प्रारंभी कारगिल युद्धात हुतात्म्य पत्करलेल्या शहीद जवानांना अभिवादन करून श्रद्धांजली वाहिली.त्यानंतर निमंत्रित सर्वांना यथोचित सन्मानाने गौरविण्यात आले.त्यात मेजर विश्वनाथ शिंदे, मेजर लक्ष्मण कलबुर्गी, मेजर भगवान जाधव, मेजर अविनाश कलशेट्टी ,मेजर हरिश्चंद्र पवार, कॅप्टन गोविंद काळे ,मेजर महादेव कोळपुरे, नायक रमेश चौधरी, मेजर गोपाळराव पाटील, मेजर शेषराव सूर्यवंशी, हवालदार इंद्रजीत म्हेत्रे, मेजर वेंकट धारगे ,मेजर दत्तात्रेय धारणे, कॅप्टन सूर्यकांत जाधव ,मेजर पांडुरंग सूर्यवंशी, आदींचा समावेश होता.प्रा.डॉ.उमाकांत सूर्यवंशी कारगिल दिनावर भाष्य करताना म्हणाले की कारगिल युद्धातील वीरांच्या स्मरणार्थ दरवर्षी 26 जुलै रोजी कारगिल विजय दिवस साजरा केला जातो. हा दिवस संपूर्ण भारतात आणि भारताची राजधानी नवी दिल्ली येथे पार पडला जातो. 1999 मध्ये लडाखमधील उत्तर कारगील जिल्ह्यातील पर्वत शिखरांवर पाकिस्तानी सैन्याला त्यांच्या ताब्यातील स्थानावरून हुसकावून लावण्यासाठी, कारगिल युद्धात धारातीर्थी पडलेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आणि भारताचा पाकिस्तान वरील विजय साजरा करण्यासाठी कारगिल विजय दिवस साजरा केला जातो ,असे सांगून भारत_ पाकिस्तानचे पूर्वापार चालत आलेले तणावपूर्ण संबंध आणि त्याचे दूरगामी परिणाम याच्यावर डॉ. उमाकांत सूर्यवंशी यांनी समुचित भाष्य केले .त्याचबरोबर कारगिल दिनाचे नवे जुने संदर्भ सांगून भारत पाकिस्तानचे भावी काळातील संबंध कसे राहतील यावर प्रकाश टाकला. यावेळी निमंत्रित सैनिकांपैकी प्रातिनिधिक स्वरूपात कॅप्टन गोविंद काळे आणि कॅप्टन सूर्यकांत जाधव यांनी आपल्या मनोगतातून आपले अनुभव कथन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आर.एन. निगडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. नागसेन कांबळे यांनी केले .सामूहिक राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.यावेळी महाविद्यातील प्राध्यापक ,प्राध्यापकेतर कार्यालयीन कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी
शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स
PGDMLT — कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर), पात्रता : B.Sc. (Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)
X-RAY — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी ,१२ वी पास
C.T.SCAN — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी ,१२ वी पास
E.C.G. — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी ,१२ वी पास
O.T. TECHNICIAN — कालावधी २ वर्ष, पात्रता : १०वी ,१२ वी पास
PG RADIOLOGY — कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर), पात्रता : B.Sc. Physics
रेडिओलॉजी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास
फिजिओथेरपी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास
ऑप्थोमेट्री — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २८ जुलै २०२६





# कालिकादेवी विद्यालयाचे, शिष्यवृत्ती परीक्षेत नेत्रदीपक यश





**शिरूर कासार :** महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागा अंतर्गत, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे. आयोजित उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित, कालिकादेवी माध्यमिक विद्यालयाने, उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन केले आहे. विद्यालयातील एकूण 'दोन विद्यार्थी' शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले आहेत.प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, व त्यांनी सुरू केलेल्या 'श्रीकालिका गुणवत्ता पॅटर्नमुळे' चि. अतुल विठ्ठल इंगळे यांनी (१७४) गुण तर चि. धनंजय अशोक भुसारे यांनी (१४४) गुण संपादन केले आहे.हे दोघे ही शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले आहेत. यामुळे विद्यालयाच्या लौकिकातही भर पडली आहे. गेल्या वर्षापासून सुरू केलेला 'श्रीकालिका पॅटर्न' सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्,मेहनत आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे दोघांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.असे उद्गार प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी या निकालाच्या संदर्भात उद्गार काढले आहेत.विद्यालयातील दोन विद्यार्थ्यांनी उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केल्यामुळे, माजी मंत्री तथा आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव,लोकनेते मा. जयदत्त (अण्णा) क्षीरसागर साहेब, मा. रोहित (दादा) क्षीरसागर साहेब. प्रशासन अधिकारी डॉ.राजूजी मचाले साहेब, सहाय्यक प्रशासन अधिकारी मा. योगेशजी पवार साहेब, कार्यवाहक एम.ए.राऊत सर, प्राचार्य केशव भांगे साहेब, उपप्राचार्य, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिष्यवृत्ती परीक्षा प्रमुख, सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.






महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २८ जुलै २०२६

# नेमकी पंढरीची वारी काय आहे

मित्रांनो,भारतातल्या संप्रदायिक बांधवांना. राम कृष्ण हरी. आज आपण नेमकी वारी काय असते? या विषयाकडे थोडसं पाहण्याचा प्रयत्न करणार आहोत.आषाढी वारी म्हणजे केवळ पंढरपूरकडे जाणारी पायी यात्रा नाही. वारी म्हणजे महाराष्ट्राच्या मातीच्या संस्कृतीचा, संतविचारांचा आणि माणुसकीच्या अखंड प्रवाहाचा एक जिवंत उत्सव आहे. लाखो वारकरी डोक्यावर तुळशीवृंदावन घेऊन, हातात भगवा पताका घेऊन, ओठांवर “ज्ञानोबा-तुकाराम”चा जयघोष करीत पंढरीच्या दिशेने चालतात. त्यांच्या पावलांमध्ये भक्ती असते; पण त्या भक्तीच्या मुळाशी समता, बंधुता, प्रेम, करुणा आणि माणुसकी असते.माझ्या दृष्टीने वारी ही समतेची सर्वात मोठी लोकशाळा आहे. या वारीमध्ये कोणी मोठे नाही, कोणी छोटे नाही. श्रीमंत-गरीब, शेतकरी-कामगार, स्त्री-पुरुष, शिक्षित-अशिक्षित, विविध जाती-धर्मांचे लोक एकाच रांगेत चालतात. एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून चालताना माणसाची खरी ओळख समोर येते.तो कोणत्या जातीचा आहे, कोणत्या धर्माचा आहे, कोणत्या भाषेचा आहे यापेक्षा तो माणूस आहे, हीच त्याची सर्वात मोठी ओळख ठरते.संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानाचा प्रकाश सर्वांसाठी खुला केला. संत तुकाराम महाराजांनी समाजातील दांभिकता, अन्याय आणि विषमता यांच्यावर कठोर प्रहार केला. संत नामदेव, संत चोखामेळा, संत जनाबाई, संत सावता महाराज,संत गोरोबा काका,संत नरहरी महाराज आणि असंख्य संतांनी भक्तीच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणले. त्यांच्या अभंगांमध्ये देव आहे; पण त्याचबरोबर दीन-दुबळ्यांचे दुःख, शोषितांचे अश्रू आणि माणुसकीची वेदना देखील आहे.म्हणूनच माझ्यासाठी वारी म्हणजे फक्त विठ्ठलाच्या दर्शनाची वाट नाही; ती माणसाच्या अंतःकरणातील विठ्ठल शोधण्याची वाट आहे.वारी म्हणजे वैष्णवांची वारी“वैष्णव जन तो तेणे कहिये, जे पीर पराई जाणे रे”—दुसऱ्याचे दुःख जाणणारा खरा वैष्णव. वारीचा खरा अर्थही हाच आहे. जो वारकरी दुसऱ्या वारकऱ्याला पाण्याचा घोट देतो, थकलेल्या व्यक्तीला आधार देतो, अनोळखी माणसाला आपले मानतो, तोच खऱ्या अर्थाने विठ्ठलाच्या मार्गावर चालत असतो.वारीत हजारो लोक असतात; पण प्रत्येकाच्या मनात एकच भावना असते“माझा विठ्ठल सर्वांचा आहे.” या भावनेतूनच वैष्णवत्व जन्माला येते.देवाच्या मंदिरात जाण्यापूर्वी माणसाच्या मनातील भेदभावाचे दरवाजे बंद झाले पाहिजेत आणि प्रेमाचे दरवाजे उघडले पाहिजेत.सर्वधर्मसमभावाची वारीवारी ही कोणत्याही एका जातीची, धर्माची किंवा पंथाची मक्तेदारी नाही. विठ्ठल हा केवळ एका समाजाचा देव नाही. तो कष्टकऱ्यांचा, शेतकऱ्यांचा, श्रमिकांचा, दुःखी माणसांचा आणि प्रत्येक श्रद्धाळू मनाचा देव आहे.वारीच्या वाटेवर अनेक धर्म, पंथ आणि विचारांचे लोक एकत्र येतात. प्रत्येकाच्या हातात वेगवेगळी ओळख असली तरी त्यांच्या हृदयात एकच भावना असते प्रेम आणि भक्ती. म्हणूनच वारी आपल्याला शिकवते की धर्म माणसांना जोडण्यासाठी आहे, तोडण्यासाठी नाही.आज समाजामध्ये धर्माच्या नावावर भिंती उभ्या केल्या जात असताना, पंढरीची वारी मात्र लाखो लोकांना एकत्र आणते. ती सांगते“देव वेगळे असू शकतात; पण माणुसकी एकच आहे.”विठ्ठलदर्शन म्हणजे आत्मदर्शनपंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी वारकरी शेकडो किलोमीटर चालतो. पायाला फोड येतात, उन्हाचा त्रास होतो, पावसाचा सामना करावा लागतो; पण त्याच्या मनातील श्रद्धा त्याला पुढे नेत असते.माझ्या मते, विठ्ठलदर्शन म्हणजे केवळ मंदिरातील मूर्ती पाहणे नाही. विठ्ठलदर्शन म्हणजे आपल्या अंतःकरणातील अहंकार कमी करणे. विठ्ठलदर्शन म्हणजे दुसऱ्याच्या दुःखात उभे राहणे. विठ्ठलदर्शन म्हणजे अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे. विठ्ठलदर्शन म्हणजे उपेक्षित, वंचित आणि दुर्बल माणसाच्या जीवनात आशेचा दिवा लावणे.ज्याला माणसात विठ्ठल दिसतो, त्यालाच खऱ्या अर्थाने विठ्ठल भेटतो.आजच्या काळातील वारीचा संदेशआज समाजात तंत्रज्ञान वाढले, संपत्ती वाढली, शहरांचा विकास झाला; पण माणूस माणसापासून दूर जात आहे. जात, धर्म, भाषा, प्रांत आणि राजकीय विचारांच्या नावावर समाजामध्ये दुरावा निर्माण होत आहे.अशा काळात वारीचा संदेश अधिक महत्त्वाचा आहे.वारी सांगतेसमता हवी.स्वातंत्र्य हवे.बंधुता हवी.न्याय हवा.आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे राष्ट्रीय ऐक्य हवे.वारीच्या दिंडीत चालताना प्रत्येक वारकरी एक संदेश देतो“आपण वेगळे नाही; आपण सारे एक आहोत.”भूमिपुत्र वाघ यांची भूमिकामाझ्यासाठी वारी ही केवळ धार्मिक परंपरा नाही; ती सामाजिक परिवर्तनाची शक्ती आहे. संतांनी ज्या समाजाची स्वप्ने पाहिली, तो समाज निर्माण करण्याची जबाबदारी आजच्या पिढीची आहे.शेतकरी आत्महत्या करीत असेल, तर विठ्ठलदर्शन अपूर्ण आहे.गरीब मुलाला शिक्षण मिळत नसेल, तर भक्ती अपूर्ण आहे.स्त्रीवर अन्याय होत असेल, तर समाजाची वारी अपूर्ण आहे.जातीय भेदभाव जिवंत असेल, तर संतांचा संदेश आपण समजून घेतलेला नाही.निसर्गाचा विनाश होत असेल, तर विठ्ठलाच्या सृष्टीचा आपण अपमान करीत आहोत.म्हणूनच आजच्या वारीने भक्तीबरोबर सामाजिक बांधिलकीची शपथ घ्यायला हवी.एक झाड लावूया.एका गरजू मुलाला शिक्षण देऊया.एका शेतकऱ्याला आधार देऊया.एका दुःखी माणसाच्या डोळ्यातील अश्रू पुसूया.एका उपेक्षित व्यक्तीला सन्मान देऊया.हीच खरी वारी.हीच खरी भक्ती.आणि हाच खरा विठ्ठल!समतेची वारी म्हणजे माणुसकीची वारी.वैष्णवांची वारी म्हणजे दुसऱ्याचे दुःख जाणण्याची वारी.सर्वधर्मसमभावाची वारी म्हणजे एकतेची वारी.आणि पंढरीची वारी म्हणजे अंतःकरणातील विठ्ठल जागविण्याची वारी.चला, संतांच्या पावलावर पाऊल ठेवून पुढे जाऊया...समतेसाठी चालूया,बंधुतेसाठी चालूया,न्यायासाठी चालूया,माणुसकीसाठी चालूया...ज्ञानोबा माऊली तुकाराम!पुंडलिक वरदा हरी विठ्ठल!

**चिंतन अनुभूती :- भूमिपुत्र वाघ**

